# मेट्रो ३ : १८ स्थानकांच्या नव्या नामकरणासाठी ८७ अर्ज

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गादरम्यानच्या नावाचे अधिकार हक्क मिळवण्यासाठी १८ स्थानकांसाठी तब्बल ८७ स्वारस्य अर्ज दाखल झाल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून देण्यात आली आहे. त्यापैकी बीकेसी मेट्रो स्थानकासाठी तब्बल १२ अर्जदारांनी स्वारस्य दाखवल्याचे दिसून आले आहे.

दादर आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ स्थानकांसाठी प्रत्येकी ९ अर्ज व स्थानिक विमानतळ व सीएसएमटी स्थानकांसाठी प्रत्येकी ७ अर्ज प्राप्त झाले आहेत. 'मेट्रो ३' मार्गिकेमुळे नोकरदार वर्गाबरोबरच निवासी विभाग एकमेकांशी जोडले जाणार असल्याने



सार्वजनिक उपक्रमातील संस्थांनीही नाम अधिकार हक्क नामावलीत सहभाग दर्शवला आहे.या अर्जामध्ये एलआयसी, इंडियन ऑईल, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, युटीआय, कोटक, आयडीएफसी फर्स्ट, एचएसबीसी बँक, इंडिगो, स्पाईसजेट, जे.एस.डब्ल्यू, ग्लॅक्सो स्मिथ क्लाईन, टाइम्स समूह, ब्लॅक स्टोन, फिनिक्स मिल्स, पिरामल,

## तिकीट दर नियंत्रणात ठेवणे होणार शक्य

तिकीट भाड्याव्यतिरिक्त मिळणाऱ्या महसुलामुळे वाहतूक व्यवस्थेच्या शाश्वत कार्यान्वयासाठी महत्त्वाचे असून, यामुळे तिकीट दर नियंत्रणात ठेवणे शक्य होणार, असल्याचे मत एमएमआरसीएलचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी स्पष्ट केले.

ओबेरॉय, डी. बी. रियाल्टी अशा बँका, विमान कंपन्या, कॉर्पोरेट कंपन्या, रिअल इस्टेट समूहांचा समावेश स्पर्धेत आहे.